**L. A. BILL No. II OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४.

२०२४ चा महा. अध्या. १.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२४ प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी २९८७-१ (१०४५—२-२०२४)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ एक–ड ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ७३ एक-ड याच्या पोट-कलम (२) च्या परंतुकामधील, " सहा महिन्यांच्या " या मजकुराऐवजी, " दोन वर्षांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९६१ चा महा. २४.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२४ चा महा. अध्या. १.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यातील सहकारी चळवळीच्या सुव्यवस्थित विकासासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) अधिनियमित करण्यात आला आहे. संस्थांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव आणण्यासाठी समितीच्या विशेष सभेसाठी सादर करावयाचे कोणतेही मागणीपत्र, अशा अधिकाऱ्याने त्याचे पद ज्या तारखेस धारण केलेले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत सादर करता येणार नाही अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ७३ एक–ड मध्ये करण्यात आली होती.

२. संस्थेच्या अधिकाऱ्यास, त्याच्या निवडणुकीनंतर, संस्थेच्या व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, ज्या कालावधीमध्ये, संस्थेच्या अधिकाऱ्याविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव आणण्यासाठी विशेष सभेसाठी असे मागणीपत्र देण्यात येणार नाही असा उक्त कालावधी, सहा महिन्यांवरून दोन वर्षांपर्यंत वाढविणे आवश्यक होते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ७३ एक–ड मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. १), प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>
दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४.

**दिलीप वळसे-पाटील,**<br>
सहकार मंत्री.

## सन २०२४ चे वि.स. विधेयक क्रमांक २.—महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे)

### (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४)

**१.** ते **७३.** ** ** **

**७३ एक-ड.** (१) जो अधिकारी त्या अधिकारपदावर निवडणुकीद्वारे निवडून आल्याच्या सामर्थ्याने ते अधिकारपद धारण करत असेल, त्यांच्याविरुद्ध अशा अधिकाऱ्याच्या निवडणुकीच्या वेळी मतदान करण्याचा हक्क असलेल्या समितीच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांनी समितीच्या बैठकीत बहुमताने अविश्वासाचा प्रस्ताव संमत केल्यास असा अधिकारी म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर असे अधिकारपद रिकामे झाल्याचे मानण्यात येईल. संस्थांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव.

(२) अशा कोणत्याही विशेष बैठकीसाठी पाठविण्याच्या मागणीपत्रावर समितीचा अधिकारी निवडून देण्याचा हक्क असणाऱ्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशाहून कमी नसतील इतके सदस्य सही करतील आणि ते मागणीपत्र निबंधकाकडे सुपूर्द करण्यात येईल. मागणीपत्र विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रितीने तयार करण्यात येईल :

परंतु, अशा विशेष बैठकीसाठी सादर करावयाचे कोणतेही मागणीपत्र पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही एका अधिकाऱ्याने आपले अधिकारपद धारण केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सादर केले जाणार नाही.

(३) ते (७) ** ** **

**७३क.** ते **७३ज.** ** ** **

**७४.** ते **१६८.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २. ]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. दिलीप वळसे-पाटील,**
सहकार मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई